# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सत्र २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३


जा.क्र/गोविग/विद्या/९६ /२०२० दि.२३/०१/२०२०

प्रति,

मा. प्राचार्य
संलग्नित महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :– दिनांक २५जानेवारी २०२० ते १० फेब्रुवारी २०२० या कालावधीत ''लोकशाही पंधरवाडा'' साजरा करण्याबाबत.

संदर्भ :– १) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर क्र.विशा/कार्या १०(३)/कावि/७७/२०२०, दि. १३/०१/२०२०.

२) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय पत्र क्र. /कार्या.१०/अका.१/निवड/कावि.६०/२०२०, दि. १५/०१/२०२०.

महोदय,

उपरोक्त संदर्भाकीत विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्य निवडणूक आयोगाने मतदारांना मतदान जागृती संदर्भात लोकशाही निरंतर शिक्षण देण्याच्या दृष्टीने दि. २६ जानेवारी २०२० ते दिनांक १० फेब्रुवारी २०२० या कालावधीत ''लोकशाही पंधरवाडा'' साजरा करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

विद्यापीठाच्या अधिनस्त असलेले सर्व महाविद्यालयात दि. २५ जानेवारी २०२० ते दिनांक १० फेब्रुवारी २०२० या कालावधीत ''लोकशाही पंधरवाडा'' कृती आराखडयानुसार साजरा करुन राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल विद्या विभागाच्या ईमेल academic.gug@gmail.com वर दि. १५/०२/२०२० पर्यत पाठवावे हि विंनती.

सहपत्र :– १) कृती आराखडा
२) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी, गडचिरोली यांचे पत्र

(दिपक जुनघरे)
उपकुलसचिव (विद्या)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी :– मा. विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.

गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
अधिष्ठाता कार्यालय
(मानवविज्ञान विद्याशाखा)
आवक क्र...158...दि 20/01/2020
जावक क्र......दि

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 208 दि. 17/01/20
जावक क्र. 239 दि. 22/01/20

विभागीय आयुक्त कार्यालय, नागपुर
जुने सचिवालय भवन, सिव्हील लाईन, नागपूर-४४०००१
संपर्क क्रमांक-०७१२-२५५५५१५
Email-dycomm_esttngp@rediffmail.com

क्र.विशा/ आस्था/कार्या १०(३)/कावि/ 77/२०२०
विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर
दिनांक:13जानेवारी, २०२०

127
14/1/2020

प्रति,

१) मा. जिल्हाधिकारी ----------(सर्व )
मुख्य कार्यकारी अधिकारी
२) जिल्हा परिषद, -------------( सर्व)
३) मा. कुलगुरू
राष्ट्रसंत तुकडोजी महाराजा विद्यापीठ, नागपूर
४) मा. कुलगुरू
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 267 दि. 17/1/20
जावक 267 दि. 17/1/20

विषय :- दिनांक २६ जानेवारी २०२०ते १० फेब्रुवारी २०२० या कालावधीत "लोकशाही पंधरवाडा" साजरा करण्याबाबत. (नोडल अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

संदर्भ :- १) श्रीमती आरती सरवदे-आहेर, सहाय्यक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क.रानिआ/रापनो-२०१७/लोकशाही पंधरवाडा /प्र.क्र १४/का-११, दिनांक २९ नोव्हेंबर २०१८.
२) श्री.किरण कुरूदकर,सचिव, राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांचे पत्र क. रानिआ-२०१९/ प्र.क्र.४/ IDE दिनांक १४ नोव्हेंबर,२०१९.
३) या कार्यालयाचे पत्र क्रमाक विशा/आस्था/कार्या १०(३) /कावि-७३//२०२० दि. १०.०१.२०२०

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाचे पत्र यासोबत संलग्न करण्यात येत आहे. प्राप्त पत्रान्वये राज्य निवडणूक आयोगाने मतदाराना मतदान जागृती संदर्भात लोकशाही निरंतर शिक्षण देण्याच्या दृष्टीने दि. २६ जानेवारी २०२० ते दिनांक १० फेब्रुवारी २०२० या कालावधीत "लोकशाही पंधरवाडा" साजरा करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

निवडणूक आयोगाचे पत्र दिनांक २९ नोव्हेंबर २०१८ व दिनांक १४ नोव्हेंबर,२०१९ अन्वये राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी जिल्हा पातळीवर कार्यक्षम नोडल अधिका-यांची नियुक्ती करून त्यांचा तपशील (नाव,पद,कार्यक्षेत्र, संपर्क क्रमांक,ई-मेल आयडी) या कार्यालयास कळवावे, हि विनंती.

सहपत्र : कृति आराखडा

Dr. Kawale 20/01/2020

(अंकुश केदार)
उपायुक्त (आस्थापना)
नागपूर विभाग, नागपूर

प्रत :- १) मा. किरण कुरूदकर,सचिव, राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत,१ ला मजला हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
२) मा. विभागीय आयुक्त यांचे स्विय सहाय्यक, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर
३) मा. उपायुक्त (सा.प्र.वि) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर

## परिशिष्ट - १

## लोकशाही पंधरवाडा -२०२० संदर्भात दिनांक निहाय कृती आराखडा

| अ.क्र. | दिनांक | राबविण्याचे कार्यक्रम | कोणी राबवायचे | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २५ जोनवारी २०२० पर्यत (पुर्वतयारी) | १) प्रत्येक महानगरपालीका, नगरपरिषदा व जिल्हातील मोठया आकाराच्या (१८ सदस्यीय) किमान २५ ग्रामपंचायतीमध्ये **"लोकशाही निवडनुकाव सुशासन "** या विषयाचे किमान १० होर्डिंग बॅनर्स लावण्यात यावेत ,तसेच या ग्रामपंचायतीसह इतर ग्रामपंचायतीच्या दर्शनी ठिकाणी (प्राथमिक आरोग्य केंद्र ,बस स्टँड, रेल्वे स्टेशन ,बाजारपेठा ई.) पोस्टर ,कापडी फलक लावण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांना निद्रेशीत करावे .<br>२)स्थानिक टिव्ही केबलवर तसेच रेडीयो चॅनलवर ३० सेंकदाची **"लोकशाही निवडणूका व सुशासन " या** विषयावर जिंगल्स तयार करुन ते २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत प्रसारीत करणे उदा. १)" जागरुक नागरिक मी भारताचा----हक्क बजावीन मतदानाचा " २) **"माझा देश माझी लोकशाही----- टिकविन ती लावुन बोटाला शाई "**<br>**३) आगामी** काळात होणा-या निवडणूकासाठी संभाव्य मतदान केंद्रातील सर्व सोयी -सुविधांची तपासणी करणे व यासाठी निधी आवश्यक असल्यास संबंधीत यंत्रणेकडे पत्राव्दारे तातडीन पाठपुरावा करणे. | विभाग अधिकारी, नगरपालिका मुख्याधिकारी, मंडळ अधिकारी/विस्तार अधिकारी /तलाठी/ग्रामविकास अधिकारी-ग्रामसेवक | मनपा आयुक्त/जिल्हाधिकारी/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग /गट विकास अधिकारी , पंचायत समिती/तहसिलदार |
| २ | २६ जानेवारी २०२० | (१) २६ जानेवारीसह सर्व प्रमुख दिवशी लोकप्रतिनिधी /प्रमुख वक्त्यांच्या भाषनामध्ये "लोकशाही,निवडणुक व सुशासन "या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये अंतर्भूत करणे.भाषणामध्ये अंतर्भूत करावयाचा परिच्छेद आपण साजरा करीत असलेल्या प्रजासत्ताक दिन हा लोकशाहीचा उत्सव असून विविध प्रयत्नामुळे आपली लोकशाही अधिकाधिक मजबुत होत आहे.लोकशाही विकेंद्रीकरणाची कास धरणा-या राष्ट्रपिता महात्मा गांधीचे १५० वे जयंती वर्ष आहे तर त्याच्या स्वप्नांची पुर्तता करणा-या ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीचे हे रोप्य महोत्सवी वर्ष आहे. हे लक्षात घेता या वर्षामध्ये त्यापुढे होणा-या सर्व निवडणुकांमध्ये<br>सर्व मतदारानी राष्ट्रीय कर्तव्य भावनेतून सहभाग घेणे आहे. तसेच स्वत: बरोबर इतर सहका-यांनाही मतदानाच्या कर्तव्यासाठी प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे.<br>२) महाविदयालयामध्ये प्रती वर्षी मतदार नोंदणी मोहीमेच्या वेळी मतदार नोंदणी करणा-या पहिल्या शंभर विदयार्थ्यानां | सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमुख लोक प्रतिनिधी | मनपा आयुक्त/ विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी, /गट विकास अधिकारी , पंचायत समिती/तहसिलदार/ मुख्याधिकारी नगरपरिषद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र उपजिल्हा निवडणुक अधिकारी वा तत्सम अधिका-यांमार्फत प्रदान करणे. | | |
| ३ | २७ ते ३१ जानेवारी २०२० | १) मा.राज्य निवडणूकं आयोग हे शासनापेक्षा स्वतंत्र असल्याचे व त्याबाबतचे सविस्तर माहिती वृत्तपत्र व साप्ताहिक यामध्ये प्रसिध्द करणे<br>२) व्यापारी,उदयोगपती यांची बैठक घेऊन मतदार यादी जागृती अभियानाची व्यापक प्रसिध्दी करण्यासाठी त्यांचे सहकार्य उपलब्ध करुन घ्यावे<br>३) आयोगाने केलेल्या खालील निवडणूक सुधारणा बाबत प्रसिध्दी देणे<br>- नामनिर्देशन पत्रासोबत शपथपत्र व उत्पन्नाचा गोषवारा देणे आवश्यक केले<br>- याचबरोबर उमेदवाराच्या गुन्हेगारी पार्श्वभूमी विषयक माहीती मतदान केंद्राच्या बाहेर मतदारांच्या माहीतीसाठी उपलब्ध करूण देण्यात आली<br>- अक्षम नोंदणीकृत राजकीय पक्षांची नोदणी रदद केली<br>- True Voters व COP यासारख्या मोबाईल ॲपची निर्मीती केली जेणेकरून उमेदवार व मतदार यांच्या सोयी बरोबरच आदर्श आचार संहितेचे स्थानिक पातळीवर काटेकोरपणे पालन करता येणे शक्य होईल.<br>- NOTA ला सर्वाधीक मते पडल्यास अशा जागी फेर निवडणूक घेणे.<br>- राजकीय पक्षांनी निवडणूकीच्या वेळी दिलेल्या आश्वासनांच्या पुर्ततेसंदर्भात जनतेसमोर दरवर्षी अहवाल ठेवावा.<br>- टपाली मतपत्रीका सैन्यात काम करणा-या सिमेवरील जवानांनाही मतदानाचा अधिकार प्राप्त. प<br>- प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दीच्या टप्प्यानवरच मतदार यादीसाठी विधानसभेचा ग्राहय धरण्यात येणारा दिनांक घोषित करण्यात येत असल्याने नव्या मतदारांना मतदार यादीत नोंदनीसाठी पुर्वसुचना मिळते | मनपा आयुक्त/ /जिल्हाधिकारी/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग /गट विकास अधिकारी , पंचायत समिती/तहसिलदार / | विभागीय आयुक्त |
| ४ | १ ते ३ फेब्रूवारी २०२० | १) १८ व १९ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांची निश्चिती करुण त्यांचे नांव मतदार यादीत अंतर्भूत करण्या संदर्भात जिल्हा निवडणूक कार्यालयासी | प्राचार्य, महाविद्यालय /मनपा विभाग | संबधीत जिल्हात असलेल्या विद्यापीठाचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालयांनी समन्वय साधणे व महाविद्यालयाच्या परिसरात अशा विदयार्थ्याकडुन मतदार नोदंणी फॉर्म गोळा करण्यासाठी कक्ष उभारणे.<br>२) महाविदयालयीन विदयार्थ्याकडुन शाळेच्या कंपाउंड वॉलसह मुख्य मार्गीका , शहरातील दळणवळणाच्या प्रमुख ठिकाणी (उदा. रेल्वे, पादचारी पुल ई.)मतदार जागृती बाबत आकर्षक सचित्र संदेश रंगविणे. | अधिकारी, गट विकास अधिकारी , पंचायत समिती /तहसिलदार | उपकुलगुरू /मनपा आयुक्त /जिल्हाधिकारी /उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग/गट विकास अधिकारी , पंचायत समिती / तहसिलदार |
| ५ | ४ ते ६ फेब्रुवारी २०२० | १) मतदार यादीत महिला मतदारांची टक्केवारी कमी आहे अशा मतदान केंद्राचा शोध घवुन त्याठिकाणी महिला मतदाराचे नाव नोंदणी करीता विशेष मोहिम राबविण्यात यावी.<br>२) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (प्रामुख्याने शहरी भागातील)इतर भाषीक मतदारांना निवडणुकीचे महत्व पटवुन देण्यासाठी व निवडणूकीतील त्यांचा सहभाग वाढवुन निवडणूकीची टक्केवारी वाढपिण्यासाठी संबंधीत ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थिती जणसामान्यांची "चुनाव पाठशाला " आयोजीत करणे | मनपा विभाग अधिकारी, गट विकास अधिकारी , पंचायत समिती /तहसिलदार | मनपा आयुक्त/ जिल्हाधिकारी/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग/ गट विकास अधिकारी, पंचायत समिती/ तहसिलदार/ |
| ६ | ७ ते १० फेब्रुवारी २०२० | १) लोकसभा व विधानसभा निवडणूका प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका बाबत काळजी घेणे तसेच "निवडणूक सुधारणा उपाय योजना " या विषयावर एक दिवसाचे चर्चासत्र घेणे.<br>२)आपल्या कार्यक्षेत्रातील स्वयंसेवी संस्था उदा." Lions Club, Rotary Club" यांच्या सहकार्याने मतदार जागृती मोहीत राबविणे. | मनपा आयुक्त/ जिल्हाधिकारी/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग/ गट विकास अधिकारी, पंचायत समिती/ तहसिलदार/ | विभागीय आयुक्त |

टिप :- सदर कृती आराखडा निर्देशात्मक (मार्गदर्शनपर) असून यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार आपल्या स्तरावर परस्पर बदल करण्यात यावा.

(अंकुश केदार)
उपायुक्त (आस्थापना)
नागपूर विभाग, नागपूर

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय

दुरध्वनी क्रमांक 07132-222011 ईमेल आयडी- dydeogad@gmail.com

क्रमांक /कार्या-10/अका-1/ निवड/कावि-60 /2020 दिनांक - 15 जानेवारी, 2020

**अतिमहत्वाचे**

प्रति,

--------------------------------------------

-------------------------------------------- (सर्व कार्यालय प्रमुख/यंत्रणा)

विषय – राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम साजरा करण्याबाबत.

संदर्भ :- मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, यांचे कार्यालयीन अ.शा. पत्र क्र. संकीर्ण 2019/प्र.क्र. 1557/19/33 दिनांक 14/1/2020.

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, देशात 25 **जानेवारी, 2020 रोजी "राष्ट्रीय मतदार दिवस"** साजरा करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने 18 वर्षे पूर्ण केलेल्या नविन तरूण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा प्रमुख उद्देश आहे. या राष्ट्रीय मतदार दिवसाच्या अनुषंगाने सर्व शाळा व शैक्षणिक संस्थामध्ये वादविवाद स्पर्धा, प्रारूप मतदान, चित्रकला स्पर्धा, क्वीझ कॉम्पीटिशन इ. स्पर्धा आयोजीत करून लोकशाही व मतदारांचा सहभाग यांचे महत्व पटवून देण्यात यावे.

राष्ट्रीय मतदार दिवशी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ सर्व मतदारांना दिली जाते. या वर्षी दिनांक 25 जानेवारी, 2020 दिवशी चौथा शनिवार निमित्त कार्यालयीन सुट्टी असल्यामुळे शपथ घेण्याचा कार्यक्रम दिनांक 24 जानेवारी, 2020 रोजी आयोजित करण्याबाबत मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी संदर्भिय अ. शा. पत्राव्दारे कळविले आहे.

तरी आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी शपथ घेण्याचा कार्यक्रम दिनांक 24 जानेवारी, 2020 रोजी आयोजित करण्यात यावा. राष्ट्रीय मतदार दिवशी इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेमध्ये घ्यावयाच्या शपथेचा नमुना सोबत जोडण्यात आला आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी
गडचिरोली

प्रतिलीपी :- माहितीस तथा उचित कार्यवाही अग्रेषित.

1. उपविभागीय अधिकारी कुरखेडा/देसाईगंज/गडचिरोली/चामोर्शी/अहेरी/भामरागड.
2. तहसिलदार (सर्व) -------------
   आपण आपले अधिनस्त असलेले सर्व कार्यालय प्रमुख/यंत्रणा यांना याबाबत आपलेस्तरावरून अवगत करण्यात यावे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी
गडचिरोली

अधिष्ठाता कार्यालय
(मानवविज्ञान विद्याशाखा)
आवक क्र. 165 दि. 22/01/2020
जावक क्र.......... दि..............

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
आवक क्र. 207 दि. 17/01/20
जावक क्र. 242 दि. 20/1/20

विभागीय आयुक्तांचे कार्यालय विकास शाखा (आस्थापना) खोली क्र.११९ नागपूर विभाग, नागपूर जुने सचिवालय इमारत १ ला माळा, सिव्हील लाईन नागपूर -४४०००१

145
15/01/2020

---

Email-ID-dycomm_esttngp@rediffmail.com क्रमांक/विशा/आस्था/कार्या१०(३)/कावि/४० /२०२०
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर
दिनांक: १५/ ०१ / २०२०

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 268 दि. 17/1/20
जावक 268 दि. 17/1/20

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, ---------------------- (सर्व)

विषय:- दिनांक २६ जानेवारी २०२० ते दिनांक १० फेब्रूवारी, २०२० या कालावधीत "लोकशाही पंधरवाडा" साजरा करण्याबाबत.

संदर्भ:- १) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/ रापनो-२०१७/ प्र.क्र.१४ /का-११ , दिनांक ०६/०१/२०१८
२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ-२०१९/ प्र.क्र.४/IDE , दि. १४/११/२०१९

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी संदर्भिय पत्रान्वये लोकशाही बळकटीकरणासाठी जरी सर्व स्तरावर लोकांचा सक्रीय सहभाग आवश्यक असला तरीही गेल्या दोन दशकात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचा अनुभव लक्षात घेता खालीलप्रमाणे मुद्यांवर आता कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे असे कळविले आहे.

i) देशाच्या विकास प्रक्रियेमधील स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व, स्थान व भूमिका अधोरेखित करणे.
ii) राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असल्याची जाणीव करुन देणे.
iii) लोकशाहीचे संवर्धन, संरक्षण आणि बळकटीकरण (Preservation, Protection & Strengthening)

Registrar 22/01/2020

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी संदर्भिय पत्रातील परिच्छेद ६ नुसार अनेक व्यापक कार्यक्रम हाती घेणेबाबत व सर्व विभागांशी समन्वय साधून पंधरवाडयाची रुपरेषा आखावी तसेच पंधरवाडा यशस्वीरित्या साजरा होईल याची दक्षता घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार नागपूर विभागामध्ये ०६ जिल्हा परिषदा, ६३ पंचायत समिती व सर्व ग्रामपंचायत स्तर या सर्वांच्या मदतीने मोठया प्रमाणात "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर जनजागृती मोहीम हाती घेण्याकरीता खालीलप्रमाणे राबविणेबाबत कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला असून, त्यानुसार कार्यवाही करावी व याबाबत आपले अधिनस्त सर्व सबंधीत यंत्रनांना कळविण्यात यावे.

22/1/2020

१) **नागपूर विभागात प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी होणारे सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यक्रमांमध्ये मुख्य वक्त्यांची भाषणे:**

प्रजासत्ताक दिन दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी होणाऱ्या सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यक्रमांमध्ये, महाविद्यालयांमध्ये मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व, निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणूका घेण्यासाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी निर्भीडपणे काम करण्याची गरज, लोकशाही जोपासण्यासाठी व टिकविण्यासाठी सर्व लोकांनी जागरुक राहण्याची गरज, इत्यादी विषयांचा समावेश असावा अशा सुचना जिल्हयातील सर्व संबंधितांना निर्गमित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) यांना कळविण्यात येत आहे. महाविद्यालयाकडून कार्यवाही संदर्भात मा. कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर व मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येत आहे.

२) **बॅनर्स लावणे:**

दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रूवारी या कालावधीत होणाऱ्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यक्रमांमध्ये सर्व ग्रामपंचायत / पंचायत समिती मध्ये ठकळ दर्शनी भागावर, मुख्य चौकात, रेल्वे स्टेशन / बस स्टॉप वर "लोकशाही, निवडणूक व सुशासन"या विषयाचे मोठया ग्रामपंचायत कडून प्रत्येक जिल्हयात किमान २५ ग्रामपंचायतींनी व इतर ग्रामपंचायतीनी किमान १० होर्डिग्ज बॅनर्स लावण्यात यावेत अशा सूचना निर्गमित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) यांना कळविण्यात येत आहे.

३) **टि. व्ही. वर जाहिरात करणे:**

मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयामार्फत दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत स्थानिक केबल धारकांमार्फत "लोकशाही, निवडणूक व सुशासन" जागृती कार्यक्रमाबाबत जाहिरात देण्यात यावी अशा सुचना पंचायत समित्या , ग्रामपंचायत स्तरावर निर्गमित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) यांना कळविण्यात येत आहे.

४) **जनजागृती:-**

दिनांक २६ जानेवारी २०२० ते १० फेब्रूवारी २०२० या कालावधीत नागपूर विभागातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिनस्त गट विकास अधिकारी यांना त्यांचे क्षेत्रातील विद्यापीठे व महाविद्यालये वाटून द्यावेत व त्याठिकाणी विद्यार्थी / विद्यार्थीनी यांची कार्यशाळा,सेमिनार घेऊन "लोकशाही, निवडणूक व सुशासन" महत्व पटवून देण्याची मोहीम पार पाडावी तसेच निबंध स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा आयोजित करण्याबाबत कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करावे अशा सुचना संबंधितांना निर्गमित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)यांना कळविण्यात येत आहे.

५) **उघोग समुहांनी विशेष कार्यक्रमाचे आयोजन :-**

जिल्हातील उघोग समुहांनी दिनांक २६ जानेवारी २०२० ते १० फेब्रुवारी २०२० या कालावधीत “लोकशाही निवडणुक व सुशासन” या विषयावर संस्थेत कार्यरत अधिकारी/कर्मचारी

यांचेकरीता विशेष कार्यक्रमांचे आयोजन करावे याबाबत त्यांना सूचना निर्गमित कराव्यात असे मुख्य कार्यकारी अधिकारी व संबधीत पंचायत समिती (सर्व) यांना कळविण्यात येत आहे.

**६) वचनपूर्तीच्या अनुषंगाने खुलामंच / खुली चर्चा:**

जिल्हयात नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांनी निवडणूकीच्या वेळी दिलेल्या वचनपूर्तीच्या अनुषंगाने दि.२६ जानेवारी ते १० फेब्रूवारी २०२० या कालावधीत खुलामंच / खुली चर्चा यासारखे कार्यक्रम आयोजित करावेत अशा सुचना जिल्हयातील सर्व संबंधितांना, पंचायत समिती / ग्रामपंचायतला निर्गमित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) यांना कळविण्यात येत आहे. त्यांनी उक्त कार्यक्रमाचा अहवाल कार्यक्रमाच्या प्रत्येकी २-२ फोटोसह राज्य निवडणूक आयोगास व या कार्यालयास सादर करावा.

**७)वर्तमानपत्रे,मासिके सोशल मीडीया माहिती देणे.**

दिनांक २६ जानेवारी २०२० ते १०फेब्रुवार २०२० या कालावधीत वृत्तपत्रे, मासिके यासारख्या छापील, सोशल मिडीया व स्थानिक केबल नेटवर्क यांचा वापर करून ७३ व ७४ वी घटना दुरूस्ती त्या अनुषंगाने निमार्ण करण्यात आलेली लोकशाहीची -- रचना, तसेच नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदा-या व कर्तव्य याबाबत माहिती देणेबाबत खालीलप्रमाणे उदिष्टे आखून देण्यात यावे व यानुसार कार्यवाही करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) यांनी त्यांचे अधिनस्त सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) व गट विकास अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त सर्व ग्रामपंचायतला अवगत करावे

दिनांक २६ जानेवारी २०२० ते १०फेब्रुवारी २०२० या कालावधीत अधिनस्त पंचायत समिती/ग्रामपंचायत क्षेत्रात पोस्टर/बॅनर/कापडी फलक तयार करून गावपातळीवर प्रमुख ठळक दर्शनी भागावर मुख्य चौकात रेल्वे स्टेशन /बस स्टॉप वर लावणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सूचना निर्गमित कराव्यात व झालेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास पोस्टर/बॅनर/कापडी फलक ची संख्या तसेच फोटोसह अवगत करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) यांना कळविण्यात येत आहे.

**८) कापडी बॅनर /फलक लावणे:**

प्रत्येक पंचायत समिती /ग्रामपंचायत स्तरावर त्यांचे क्षेत्रात गावाचे मुख्य दर्शनीय म्हणजेच बस स्टॅण्ड,रेल्वे स्टेशन बाजारपेठा ईत्यादी ठिकाणी कापडी बॅनर/फलक लावण्याबाबत निर्देश देण्यात यावे.

**९ ) पोस्टर्स :-**

प्रत्येक पंचायत समिती व त्यांचे ग्रामपंचायत क्षेत्रात ग्रामपंचायत स्तरावरून गावाचे मुख्य दर्शनीय म्हणजेच बस स्टॅण्ड,रेल्वे स्टेशन बाजारपेठा ईत्यादी ठिकाणी मोठया ग्रामपंचायत ने १००० लहान ग्रामपंचायतने ५०० पोस्टर लावण्याबाबत निर्देश द्यावेत.

**१०) माहिती पत्रके वाटणे:-**

मोठया ग्रामपंचायत २५०० ते ३५०० पत्रके, मध्यम ग्रामपंचायत २००० ते २५०० पत्रके तर लहान ग्रामपंचायत १५०० ते २००० पत्रके वाटण्याबाबत आपले स्तरावरून देण्यात यावे.

**११) रेस्टॉरेंट / हॉटेल्स, बँकांच्या शाखा, मॉल्स इत्यादींची मदत घेणे:**

जिल्हयातील रेस्टारंन्ट / हॉटेल्स, बँकांच्या शाखा, मॉल्स यांचेकडून दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रूवारी २०२० या कालावधीत लोकशाहीची त्रिस्तरीय रचना, तसेच नागरीक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य याबाबत तसेच "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर गावा-गावामध्ये पोस्टर / बॅनर्स/ कापडी फलक लावणेबाबत तसेच चर्चासत्र आयोजित करण्याची कार्यवाही करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व अधिनस्त कार्यालयास कळवावे.

सबब वरील प्रमाणे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ त्यांचे क्षेत्रातील सर्व पंचायत समिति चे गट विकास अधिकारी यांना वरीलप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश द्यावेत व केलेल्या कार्यवाही बाबत व लोकशाही पंधरवाडा पार पाडल्याबाबतचा सविस्तर विस्तृत अहवाल राज्य निवडणूक आयोग व या कार्यालयास दिनांक ११ फेब्रूवारी २०२० पर्यंत सादर करावा.

(डॉ. संजीव कुमार)
विभागीय आयुक्त
नागपूर

प्रत:- माहितीस तथा योग्य कार्यवाहीस.

१) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२) जिल्हाधिकारी --------------------------(सर्व).
३) मा. कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४) मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५) निवड नस्ती.